
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र | बुधवार, 25 फेब्रुवारी 2026 | | अंक क्र. 277 | वर्ष 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

''आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल''
हॉटेल बालाजी
ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.



# राष्ट्रीय संत श्री गाडगेबाबा यांच्या 150 वी जयंती अंबाजोगाई येथे उत्साहात साजरी

**अंबाजोगाई | अशोक दळवे**

समाजप्रबोधन, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांचा अखंड ध्यास घेतलेले संत गाडगेबाबा हे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनातील तेजस्वी दीपस्तंभ होते. साधी वेशभूषा, हातात झाडू आणि ओठांवर कीर्तनातून समाजजागृती—या माध्यमातून त्यांनी लोकांच्या मनात परिवर्तनाची ज्योत पेटवली. "स्वच्छता हीच सेवा" हा त्यांचा संदेश आजही तितकाच प्रेरणादायी आहे. त्यांनी गावोगावी फिरून स्वच्छतेचे महत्त्व पटवून दिले, व्यसनमुक्तीचा संदेश दिला आणि शिक्षण, दया, करुणा व मानवतेचे संस्कार रुजवले. समाजातील गरिब, पीडित आणि वंचित घटकांसाठी त्यांनी आयुष्य वेचले. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचे अनुकरण करून स्वच्छ, सुसंस्कृत आणि समतामूलक समाज घडवण्याचा संकल्प करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

"श्री संत गाडगेबाबा यांनी आयुष्यभर स्वच्छतेचा संदेश दिला. श्री संत गाडगेबाबा आपल्यासाठी दीपस्तंभ आहेत. त्यांच्याच विचारांचा वारसा पुढे चालवत, अंबाजोगाई शहरात स्वच्छ अंबाजोगाई , सुंदर अंबाजोगाई ' हे संदेश नेण्याचा आपला निर्धार आहे. नागरिकांनीही स्वच्छतेमध्ये सहभागी होऊन तो लोकसहभागातून एक यशस्वी निर्धार करावा, असे प्रतिपादन अंबाजोगाई नगरींचे नगर परिषदेचे नगराध्यक्ष श्री नंदकिशोर मुंदडा यांनी केले.

श्रीसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त श्री संत गाडगेबाबा परिट समाजमंदिर गणेश नगर बलुतेचा मळा अंबाजोगाई या ठिकाणी पार पाडण्यात आली

अध्यक्षस्थानावरून यावेळी बोलताना नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा म्हणाले की, गाडगेबाबांच्या नावाने या भागात उभ्या राहणाऱ्या सभागृहासाठी नगर परिषदेच्या माध्यमातून सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. या कार्यासाठी नागरिकांनीही प्रशासनाला साथ देऊन आपले परिसर स्वच्छ ठेवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. त्यांच्या या घोषणेचे उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत केले.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून नगर पालिकेचे नवनिर्वाचित उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया यांनी मार्गदर्शन केले तसेच उपस्थित मान्यवर नगरसेविका रेखा विलास जाधव यांनी सुद्धा गाडगेबाबा यांचे विचार डोक्यात ठेवून कार्य करावे असेल संबोधले मा. नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, सोनल धायगुडे नगरसेवक ,गणेश देशमुख नगरसेवक , संजय गंभीरे नगरसेवक , महेश कदम नगरसेवक , महेश अंबाड नगरसेवक ,गोविंद तांदळे.( केज विधानसभा अनुलोम मुख्यमंत्री सहाय्यक प्रमुख ), संकेत मोदी, श्रीकांत धायगुडे, व्यंकटेश जोशी पत्रकार बालाजी शेरेकर आत्माराम कदम हे मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतातून गाडगेबाबांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाबासाहेब जाधव, अशोक जाधव, विलास जाधव, संजय जाधव, अजय जाधव, गुलाबराव जाधव, महादेव जाधव, धनंजय जाधव, बालाजी लोखंडे, गणेश लोखंडे, योगेश राऊत,रमेश जाधव, कैलास सवणे, डिगंबर जाधव, मदन जाधव, हनुमंत सरपाळे, शरद सौदागर (ग्रामसेवक), सोपान शिंदे, अर्जुन जाधव, अशोक दळवे, सचिन जाधव, वैजनाथ जाधव, अविनाश शिंदे ,अमोल शिंदे, श्रीकांत काळे, अनिकेत पवार,राहुल भोसले, सुशील भोसले, लक्ष्मण भोसले, सुग्रीव जाधव, अंगद जाधव, मनोज सौदागर, रवींद्र रोकडे, पांडुरंग पवार, सुशील जाधव गोविंद जाधव, तानाजी राऊत, वैभव सरपाळे, बालाजी राऊत, शशिकांत दळवे, पांडुरंग दळवे, सुरेश पवार,किशोर दळवे,विकास राऊत,पंकज शिंदे, रविकिरण जाधव, योगेश राऊत, अनिल जाधव, विठ्ठल जाधव, या आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जाधव यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संतोष भालेकर यांनी मानले. या सोहळ्याला परिसरातील महिला, पुरुष व बालकांची मोठी उपस्थिती होती.

# 'गॉड्स ओन कंट्री'ची नवी ओळख! केरळचे नाव आता 'केरळम'

## केंद्र मंत्रिमंडळाची ऐतिहासिक मंजुरी

**नवी दिल्ली | वृत्तसंस्था**

दक्षिण भारतातील महत्त्वाचे राज्य आणि 'गॉड्स ओन कंट्री' म्हणून जागतिक स्तरावर ओळख असलेल्या केरळच्या नावात ऐतिहासिक बदल करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. केरळचे अधिकृत नाव आता 'केरळम' करण्यात येणार असून या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दिला आहे.




राज्याच्या सांस्कृतिक, भाषिक आणि ऐतिहासिक अस्मितेला अधोरेखित करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. राज्य विधानसभेने यापूर्वी एकमताने ठराव मंजूर करून केंद्राकडे नाव बदलाचा प्रस्ताव पाठवला होता. त्या प्रस्तावावर सकारात्मक निर्णय घेत केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे.

या निर्णयामुळे राज्याच्या अधिकृत कागदपत्रांमध्ये, घटनात्मक नोंदींमध्ये तसेच प्रशासकीय व्यवहारात 'केरळ' ऐवजी 'केरळम' असा उल्लेख केला जाणार आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भाषिक ओळख जपण्याच्या दृष्टीने राज्यांनी आपल्या नावांमध्ये बदल केले आहेत; त्याच परंपरेत हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

आगामी काळात निवडणुका आणि राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाकडे राजकीय दृष्टिकोनातूनही पाहिले जात आहे. मात्र राज्य सरकारच्या मते, हा निर्णय केवळ सांस्कृतिक ओळख आणि स्थानिक भाषेचा सन्मान राखण्यासाठी घेतला गेला आहे.'गॉड्स ओन कंट्री' म्हणून प्रसिद्ध असलेल्या राज्याची ही नवी ओळख प्रशासनिक प्रक्रियेनंतर लवकरच अधिकृतपणे लागू होणार आहे.

# तिसऱ्या तिमाहीत जीडीपी वाढ ८.१ टक्क्यांपर्यंत; भारतीय अर्थव्यवस्थेची मजबूत झेप

**मुंबई | वृत्तसंस्था**

भारतीय अर्थव्यवस्थेची गती कायम राहण्याची चिन्हे स्पष्ट होत असून चालू आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) वाढ दर सुमारे ८.१ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सुधारित मालिकेनुसार हा वाढीचा अंदाज नोंदवण्यात आला असून अर्थव्यवस्थेची स्थिरता अधोरेखित होत आहे.




राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (NSO) जाहीर केलेल्या पहिल्या आगाऊ अंदाजानुसार २०२५-२६ या आर्थिक वर्षात वास्तविक जीडीपी वाढ सुमारे ७.४ टक्के राहण्याची शक्यता आहे, जी मागील वर्षातील ६.५ टक्क्यांच्या तुलनेत अधिक आहे. नव्या मोजणी पद्धती आणि सुधारित मालिकेचा विचार करून तिसऱ्या तिमाहीत वाढीचा दर ८.१ टक्क्यांच्या आसपास राहील, असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

देशांतर्गत मागणी, सेवा क्षेत्रातील वाढ आणि विविध क्षेत्रांतील स्थिर आर्थिक क्रियाशीलतेमुळे अर्थव्यवस्था मजबूत राहिल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. जागतिक स्तरावरील अनिश्चितता आणि बाह्य अडचणी असूनही भारतीय अर्थव्यवस्थेने सातत्याने चांगली कामगिरी केल्याचेही स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, जीडीपी मापनासाठी आधार वर्षात बदल आणि सुधारित आकडेवारीमुळे आधीच्या तिमाहीतील आकडेही अद्ययावत होण्याची शक्यता आहे. डिजिटल कॉमर्स, सेवा क्षेत्र आणि पायाभूत क्षेत्रातील वाढत्या योगदानामुळे आर्थिक संरचनेत सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

आर्थिक तज्ज्ञांच्या मते, स्थिर धोरणे, वाढती गुंतवणूक आणि मजबूत अंतर्गत मागणी यामुळे आगामी काळातही भारताची आर्थिक वाढ वेगवान राहण्याची शक्यता आहे.

# वर्षभरात ४८ हजार महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता

## १३ हजारांचा अद्याप शोध नाही

**मुंबई | वृत्तसंस्था**

राज्यात गेल्या वर्षभरात तब्बल ४८ हजार २७८ महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. त्यापैकी सुमारे १३ हजार अल्पवयीन मुली आणि महिलांचा अद्याप शोध लागलेला नसल्याचे गृहविभागाने विधानसभेत लेखी उत्तराद्वारे स्पष्ट केले.

मुंबई, नवी मुंबई, रायगड, नागपूर, छत्रपती संभाजीनगर यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण अधिक असल्याचेही नमूद करण्यात आले आहे. हरवलेल्या महिलांमध्ये मोठ्या प्रमाणात अल्पवयीन मुलींचा समावेश असल्याने परिस्थिती




अधिक चिंताजनक बनली आहे.

२०२५ या वर्षात हरवलेल्या ४८ हजार २७८ महिलांपैकी ३६ हजार ५८१ महिलांचा शोध लावण्यात पोलिसांना यश आले आहे. मात्र ११ हजार ६९७ महिला अद्याप बेपत्ता आहेत. तसेच १२ हजार ११३ अल्पवयीन मुलींपैकी १० हजार २१५ मुली सापडल्या असल्या, तरी १ हजार ८९८ मुलींचा शोध लागलेला नाही.

दरम्यान, बेपत्ता मुलांचा शोध घेण्यासाठी राज्य सरकारने २० जानेवारीपासून 'ऑपरेशन मुस्कान' ही विशेष मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत पोलिसांकडून हरवलेल्या मुलांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके कार्यरत असून तपास अधिक वेगाने सुरू असल्याचे सांगण्यात आले.

वाढत्या बेपत्ता प्रकरणांमुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण असून, महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. तज्ज्ञांच्या मते, मानवी तस्करी, कौटुंबिक वाद, ऑनलाइन फसवणूक आणि सामाजिक कारणे यामागे असू शकतात.या पार्श्वभूमीवर पोलिस यंत्रणा, समाज आणि पालकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

# रेणापूर तालुक्यात चोरट्यांचा सुळसुळाट; व्हिडिओ सोशल मीडियाला होत आहे व्हायरल!

## मोटारी, दुचाकी चोरीसह लूटमारच्या घटनांनी नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**रेणापूर | बातमीपत्र**

तालुक्यात अलीकडच्या काळात चोरी, लूटमार आणि छेडछाडीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाल्याने नागरिक आणि शेतकरी भयभीत झाले आहेत. विशेषतः शेतातील पाणी देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मोटारी मोठ्या प्रमाणात चोरीला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.

ग्रामीण भागात शेतकऱ्यांच्या विहिरीवरील मोटारी चोरी जाण्याच्या घटना सातत्याने घडत असून त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. याशिवाय दुचाकी चोरी, रात्री रस्त्यावर वाहन अडवून लुटमार करणे, तसेच दुकानफोडीच्या घटनांमुळे कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला आहे.

२२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री लखमापूर फाटा (ता. रेणापूर) येथे दुकान फोडण्याचा प्रकार घडल्याचा व्हिडिओ समोर आल्याने परिसरात





खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी पोलिसांनी तात्काळ दखल घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, अनेक पीडितांनी पोलिस ठाण्यात तक्रार देण्याचा प्रयत्न केला असला तरी काही प्रकरणांमध्ये तक्रारी नोंद झाल्या नसल्याचीही चर्चा नागरिकांमध्ये आहे. भीतीमुळे अनेक जण पोलिस ठाण्यात जाण्यास कचरतात, असेही सांगितले जात आहे.

या वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे शेतकरी, व्यापारी आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला असून रात्रीच्या गस्तीत वाढ करून आरोपींवर कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# दाट आयब्रोने खुलवा सौंदर्य



चेह-यावर महत्त्वाचा भाग म्हणजे डोळ्यांवर असलेल्या आयब्रो... आपल्या आयब्रो सुंदर आणि आकर्षक असाव्यात असे प्रत्येक मुलीला वाटत असते. त्यासाठी मुली दर महिन्याला पार्लरमध्ये जात असतात. आयब्रो जाड आणि दाट असल्यावर तर अजूनस सुंदर दिसात. यासाठी मुली आयब्रो पेन्सिलचा वापर करतात. परंतु काही घरगुती उपाय करुन नैसर्गिकरित्या आयब्रो जाड आणि उठावदार करता येऊ शकता.

### कांद्याचा रस

कापसाच्या साहाय्याने कांद्याचा रस आयब्रोवर लावा. 15 मिनिटांनंतर थंड पाण्याने चेहरा धुवून घ्या. हा प्रयोग नियमित केल्यास तुम्हांला नक्कीच फायदा होऊ होईल.

### मेथीचे दाणे

मेथीचे दाणे रात्रभर पाण्यात भिजवून त्याची पेस्ट करा. सकाळी तयार पेस्ट आयब्रोवर लावा व 5 मिनिटांनी धुवा. यामुळे केस वाढत नसले तरीही त्याची गळती रोखण्यास आणि ब्रॉडनेस वाढवण्यास मदत होईल.

### बदामाचं तेल

या तेलाचा वापर नियमित केल्याने आयब्रो वाढण्यास आणि त्याचे पोषण होण्यास मदत होते. यातील व्हिटामिन ई केसांची वाढ सुधारतात. त्यामुळे रात्री झोपण्यापूर्वी हा मसाज करायला विसरू नका.

### जास्वंद

जास्वंदाची पेस्ट केसांची वाढ सुधारण्यास मदत करते. यामुळे केसांची मूळं घट्ट होण्यास मदत होते.

### कोरफड

यामुळे आयब्रोची वाढ सुधारते तसेच त्वचा मुलायम होण्यास मदत होते. आयब्रोला त्यामुळे नियमित कोरफडीच्या गराने मसाज करावी.

### एरंडेल तेल

यातील ओमेगा 3 फॅटी ॲसिड रक्तप्रवाह सुधारण्यास मदत करतात. परिणामी केसांची वाढ सुधारते. याकरिता रोज रात्री आयब्रोला एरंडेल तेल लावून झोपा.

### खोबरऱ्याचे तेल

विरळ आयब्रो असणाऱ्यांसाठी हा एक उत्तम उपाय आहे. कोमट तेल आयब्रोला लावा. यामुळे त्वचा मुलायम होण्यास मदत होते. तेलाऐवजी तुम्ही नारळाचे दूधही वापरू शकता.

# नैसर्गिक सौंदर्यासाठी काही टिप्स...

आपण सुंदर दिसण्यासाठी अनेक उपाय करतो. कधी कपड्यांचे तर कधी मेकअप करुन आणि विविध स्टाईलचा वापर करुन आपण सुंदर दिसण्यात यशस्वी होतो, परंतु ही सुंदरता मर्यादीत काळापर्यंतच राहते. आज आपण पाहणार आहोत अशा गोष्टी ज्या तुम्हाला आतुन सुंदर बनवतील...सुंदर दिसण्यासाठी तुम्ही कशाचाही वापर करा करा परंतु चेह-याची खरी चमक ही तुमच्या आत्मविश्वासाने वाढते. वैज्ञानिकांनीही गोष्ट मान्य केली आहे. जेव्हा तुम्ही कोणत्याही कार्यक्रमात किंवा सम्मेलानात सहभागी होता किंवा एखादा इंटरव्यू द्यायला जाता. प्रत्येक ठिकाणी तुमचा आत्मविश्वास असलेला चेहरा आकर्षित करतो. तुमचे हेच आकर्षण तुम्हाला सर्वात सुंदर बनवते. यामुळे तुमच्या आजुबाजूच्या लोकांना स्वतःमध्ये आत्मविश्वासाची कमी जाणवते. अनेक वेळा तुमचा आत्मविश्वास तुम्ही काही न करता तुम्हाला यशस्वी करतो.

### प्रसन्न मन

मनाचा आनंद नेहमी चेह-यावर दिसतो, आणि चेह-याची चमचक आपोआप वाढते. हसमुळ चेहरा प्रत्येकाच्या मनात जागा बनवतो आणि प्रत्येक व्यक्ती त्याकडे आपोआप आकर्षित होतो. एखाद्या कार्यक्रमात आपला खुश चेहरा प्रत्येकाच्या आकर्षणाचे क्रेंद ठरतो. प्रसन्न मनाचा फायदा तुमचा चेहरा आणि तुमचे मन या दोन्हींवर पडतो.





### मेडिटेशन

मेडिटेशन आपल्या मनाला एकाग्र करण्यासोबतच आपल्या मनाला शांत करते, ज्याचा प्रभाव तुमच्या चेह-यावर प्रत्यक्ष दिसु लागतो. मनाची शांती जेव्हा, सौम्यता आणि धैर्यासोबतच चेह-यावर उतरते तेव्हा तुमची आंतरीक सुंदरता खुप आकर्षक दिसते. मेडिटेशन तुमच्या हाव-भाव आणि स्वभावाला सुंदर बनवते. ही आंतरिक सुंदरता थोडा वेळासाठी नाही तर नेहमीसाठी तुमच्या सोबत राहते.

### योग-व्यायाम

योग, व्यायाम किंवा एक्सरसाईज काहीही असो, हे तुमच्या शरीर आणि आत्मा दोघांनाही सुंदर बनवते. तुमच्यामध्ये सकारात्मक ऊर्जेचे संचार करते. जे तुमच्या चेह-यावर सहज दिसते. योग मानसिक आणि शारिरीक दोन्ही प्रकारे प्रभावित करते, आणि व्यायामामुळे शरीरातील रक्तसंचार सुव्यस्थित होते ज्यामुळे चेह-यावरील ग्लो वाढतो. तुमच्यातील विकृतीही दुर होउन जाते.

### फळ आणि भाज्या

भोजनामध्ये तेल आणि मसालेदार पदार्थ खाण्याऐवजी सात्विक भोजन आणि भोजनात भरपूर फळे आणि हिरव्या भाज्या असायला हव्या, हे खुप फायदेशीर असते. यासोबतच यामध्ये पोषणतत्त्वांसोबतच पाण्याचे प्रमाण जास्त असते. प्रत्येक प्रकारचे फळ नियमानुसार सेवन केल्याने तुमच्या शरीरात व्हीटॅमिन आणि मिनरल्सची कमतरता दुर होते आणि शरीर स्वस्थ राहते. यामुळे चेह-यावर नैसर्गिक चमक येते.

### सकारात्मक दृष्टीकोण

तुम्ही तुमच्या जीवनात कितीही यशस्वी झाले, कीतीही चांगले असाल तरी जोपर्यंत तुम्ही सकारात्मक राहत नही तो पर्यंत ते यश काहीच कामाचे नाही. सकारात्मकतेचा तुमच्या व्यक्तिमत्त्वावर येवढाच प्रभाव पडतो जेवढा पोषक तत्त्वांचा तुमच्या शरिरावर. सकारात्मकता तुम्हाला आतुण सुंदर बनवते. तुम्हाला तुमच्यामध्ये एका सुंदरतेची जाणीव होईल, जी तुम्हाला तुमच्या चेह-यावर दिसेल.

# डोळ्यांची काळजी घेण्यासाठी...




डोळ्यांची सूज कमी करणे तसेच त्यांची सुंदरता वाढविण्याकरिता तुमच्या स्वयंपाक घरात हमखास मिळणाऱ्या काही गोष्टी उपयोगी येऊ शकतात. त्यातलीच एक आहे काकडी. काकडी ही थंडी असते आणि त्यात पाण्याचे प्रमाण जास्त असते. जर डोळे थकल्या सारख वाटते असतील तर काकडीचे कप करून ते डोळ्यावर ठेवा त्यने डोळ्यातील उष्णता कमी होऊन डोळे शांत होतील आणि थकवा जाईल.

वापरलेल्या टी-बॅग्स देखील तुम्ही वापरू शकता त्याकरिता टी-बॅग्स फ्रीजर मध्ये ठेवा आणि मग त्यांना डोळ्यांवर ठेवा, त्याने डोळ्यांची सूज कमी होईल आणि ते फ्रेश दिसतील.डोळ्यांतला तेज परत आणण्याकरिता सुकलेल्या आवळ्याच्या फोडींना रात्रभर एक वाटी पाण्यात भिजू घाला, त्याचा ज्यूस काढा आणि त्यात परत एक वाटी पाणी घाला. त्याने रोज सकाळी डोळे धुवा. अगदी काही दिवसातच तुम्हाला तुमचे डोळ्यांतील निस्तेजपणा कमी झाल्याचे आढळेल.तसेच लॅव्हेंडर ऑईल देखील डोळ्यांची सुंदरता वाढविण्याचे काम करते. एक वाटी पाण्यात एक थेंब लॅव्हेंडर ऑईल घाला आणि त्यात दोन कापसाचे बोळे टाका नंतर त्या कापसांच्या बोळ्यांना डोळ्यांवर ठेवा. यामुळे डोळे अतिशय तजेलदार आणि टवटवीत दिसतात.


# केसाना हवे कंडिशनर

प्र त ये का ला मुलायम आणि चमकदार केस हवे असतात. यासाठी कं डि श न र ही वापरले जाते. परंतु हवे तसे परिणाम मिळत नसतील तर समजा तुम्ही चुकीच्या पद्धतीने याचा वापर करत आहे. चांगल्या परिणामासाठी असा करा कंडिशनरचा वापर...

- केसाचे सेटिंग करण्यापूर्वी कंडिशनिंग करून घ्यावे. यामुळे ते अधिक चांगले सेट करता येतात. कंडिशनर केसाना लावावे ते टाळूला लाऊ नये.
- कंडिशनिंग करण्यापूर्वी केस स्वच्छ धुऊन घ्यावेत. जेणेकरुन शॉम्पू पूर्णपणे निघून जाईल.
- कंडिशनर वापरण्यापूर्वी केसामधील जास्तीचे पाणी काढावे. साधारणपणे पाच मिनिटांनी कंडिशनर पूर्णपणे धुवावे.
- केस खूपच खराब झालेले असल्यास कंडिशनरचे प्रमाण थोडे अधिक घ्यावे व थोडा अधिक वेळ लावून ठेवावे.
- घरच्याघरी कंडिशनर करायचा असल्यास अंडे, मेंदी, मेथी किंवा जास्वंदाच्या पानांचा वापर करता येईल.
- कंडिशनरच्या वापरामुळे केसावर एक संरक्षक आवरण निर्माण होते. याच्यासाठी कंडिशनिंग करण्यापूर्वी शॉम्पू वापरून केस स्वच्छ करून घ्यावेत आणि नंतरच कंडिशनिंग करावे.



# पांडुरंग वामन काणे



विख्यात कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे ( जन्मः ०७-मे-१८८० मृत्यू : १८-एप्रिल-१९७२ ) हे विल्सन कॉलेज, मुंबई येथून एम. ए. झाले. त्यांना मराठी, हिंदी खेरीज संस्कृत, जर्मन, फ्रेंच इ. भाषा अवगत होत्या.कोकणातील वेदशास्त्रपारंगत अशा मध्यमवर्गीय कुटुंबात काणे यांचा जन्म झाला. अतिशय मेहनतीने स्कॉलरशिप मिळवत आणि एकीकडे शिकवत राहून त्यांनी खूप विद्या संपादन केली. संस्कृत भाषेवर अतिशय प्रेम, त्यामुळे बी.ए.ला संस्कृतमध्ये सर्वप्रथम, मग एल्एल.बी., झाला वेदान्त पारितोषिकासह एम.ए. आणि 'हिंदू-मुसलमान कायदा' घेऊन एलएल.एम. हे त्यांचे शिक्षण.१९०४ साली रत्नागिरी जिल्ह्यातील शाळेत शिक्षक म्हणून कामास काणेंनी सुरूवात केली. नंतर ते एल्फिंस्टन हायस्कूल, मुंबई येथे नोकरीवर होते. पुढे ते मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू झाले.प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास, सामाजिक अभिसरणाचे भान या दोन अगदी वेगळ्या वाटणाऱ्या गोष्टींमधून काण्यांनी 'धर्मशास्त्राचा पंचखंडात्मक इतिहास' नावाचा ग्रंथ सिद्ध केला. त्यांचे प्राचीन भाषा, वाङ्मय, काव्य महाकाव्य, अलंकारशास्त्र यांचे प्रेम आणि कायदेविषयक जाण, तार्किक मांडणी, प्रथा आणि परंपरांचा कालानुरूप अर्थ लावण्याची क्षमता या आणि अशा शेकडो पैलूंचे एक विस्मयकारी मिश्रण पांडुरंगशास्त्रींच्या लेखनात झाले.

मग केमिकल टेक्नॉलॉजी आणि केमिकल इंजिनिअरिंगकडे वळले. त्यांना लंडनच्या इंपीरियल कॉलेजमधून इंधन वायूंच्या ज्वलनाच्या अभ्यासासाठी पीएच.डी मिळाली आहे.. डॉ.गोविंद पांडुरंग काणे हे मुंबई विद्यापीठात प्रपाठक, प्राध्यापक होते आणि नंतर माटुंग्याच्या यू.डी.सी.टी.मधे डायरेक्टर झाले. त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. गोविंद पांडुरंग काणे हे दिल्लीच्या उद्योग मंत्रालयाचे वैज्ञानिक सल्लागार होते. त्यांना पद्मश्री देण्यात आली होती.नातू डॉ. शांताराम यांना मुंबईच्या आयआयटीकडून डॉक्टरेट मिळाली आहे.

# कथा: राक्षस, चोर आणि ब्राह्मण

ए का गावात एक द्रोण नावाचा ब्राह्मण राहत होता. तो अतिशय गरीब होता. पूजापाठ करून जे द्रव्य मिळेत, त्यावरच तो आपला उदरनिर्वाह करीत असे. एके दिवशी एका यजमानने त्या गरीब ब्राह्मणाला दोन चांगल्या दुभत्या गायी दान दिल्या. दानात मिळालेल्या त्या दोनी गायी त्यानं घरी आणल्या अन् त्या दिवसापासून त्या ब्राह्मणाचं दैन्य पळालं. एके काळी शिळी पोळी भाजी खाणार तो ब्राह्मण! गावात दूध, दही, लोणी, तूप विकून घरातही दूध भाकरी खाऊ लागला. द्रोण ब्राह्मणाच्या त्या दोनही सुंदर गायींवर एका चोराची नजर होती. सुयोग्य संधी बघायची अन् ब्राह्मणाच्या या दोन्ही गायी पळवायच्या, असा त्या चोराचा डाव होता. एका अवसेच्या अंधारात तो चोर त्या गायी चोरून नेण्यासाठी येत असताना वाटेतच त्या चोरीचा गाठ एका राक्षसाबरोबर पडली. परस्परांनी एकमेकांना 'तू कुठे अन् का जातोस,' ते विचारलं. चोर म्हणाला, 'मी द्रोण ब्राह्मणाच्या गायी चोरायला चालली आहे. पण तू कुठे चालला आहेस?' अरे, मी तर प्रत्यक्ष त्या ब्राह्मणालाच मारायला, त्याचे भक्षण करायला चालली आहे. ह्या ब्राह्मणानं मंत्र-तंत्र करून माला दूर घालवायचं, माझं अन्न-पाणी तोडलंय, पण आज मी त्यालाच खाणार आहे. झालं! दोघांचही लक्ष एक निघालं. दोघांनी मैत्रीचा हात पुढे केला. तो चोर अन् राक्षस हे दोघं त्या ब्राह्मणाच्या दारांत आले. दोघांनीही घरात डोकावून पाहिले, तर तो ब्राह्मण बिचारा शांत झोपला होता. राक्षस ब्राह्मणाला खायला जाणार, तोच चोर म्हणाला, अरे थांब! मी आधी दोन्ही गायी घेऊन जातो, मग तू त्याला खा. त्यावर राक्षस म्हणाला, वा रे वा! मोठा शहाणाच आहेस की तू! तू गायींना नेताना त्या हंबरल्या, तर तो जागा होणार नाही का ! मग मी काय करू? राक्षसाचं हे म्हणणं चोराला पटेना अन् चोर आपली घाई सोडेना. असं करता-करता हळूहळू त्यांचे एकमेकांचे आवाज तापू लागले. परस्परांतला संवाद संपू लागला. अन् वाद-विवाद भांडणं चालू झाली. त्यात त्या दोघांनी आपल्या मोठ्या आवाजचं भात राहिलं नाही. ते आवाज ऐकून गायी हंबरल्या. मोत्यानं भुंकायला सुरूवात केली. ब्राह्मणही झोपेतून जागा झाला. त्याने राक्षस अन् चोराला पकडून आरडा-ओरडा केला. त्या आवाजानं शेजारी मंडळी काठ्या, मशाली इ. घेऊन धावत आले. त्यांना पाहून राक्षस आगलील आणि चोर लोकांना पाहून धूम पळून गेला.

तात्पर्य : फुकट शब्दानं शब्द वाढवून वादविवाद करू नये. भांडणाने फायदा तर होणे दूरच, पण अनेकदा नुकसानच होते.

# पक्ष्यांची ओळख

## कृष्ण थिरथिरा






कृष्ण थिरथिरा साधारणपणे १५ सें. मी. आकाराचा पक्षी असून नराचे डोके, पाठ, पंख व छातीचा भाग काळा, पोटाचा भाग नारिंगी, सतत हलणारी शेपटी नारिंगी-तपकिरी रंगाची असते तर मादी फिकट तपकिरी रंगाची असते. कृष्ण थिरथिरा हा शेपटी नाचवत किडे शोधत फिरत राहणारा पक्षी आहे. उन्हाळ्यात उत्तर भारतात हिमालयाच्या गढवाल भागापासून नेपाळ पर्यंत राहणारा हा पक्षी हिवाळ्यात उर्वरीत भारतभर तसेच बांगलादेश मध्ये आढळतो. कृष्ण थिरथिराचे काही जातभाई युरोप मध्येही आढळतात. ते वरील कृष्ण थिरथिरा पेक्षा रंगाने वेगळे आहेत. पण आकार आणि सवयी साधारणपणे सारख्याच आहेत. कृष्ण थिरथिरा दगडी माळराने, बागा, जंगलाच्या बाहेरील हद्दीत राहणारा पक्षी आहे.मे ते ऑगस्ट हा याचा वीणीचा हंगाम असून मादी एकावेळी निळसर-हिरवट रंगाची ४ ते ६ अंडी देते. याचे घरटे गवत, केस, कापूस, पिसे इ. वस्तुंपासून बनलेले असते. सहसा घरटे एखाद्या मोठ्या खडकाखाली किंवा जमिनीत असते. युरोपियन कृष्ण थिरथिराचे घरटे जुनाट घरांच्या भिंतींमध्येही आढळले आहेत.

## कविता

# कोंबडीला आला टेलिफोन



कोंबडीला आला टेलिफोन
तिनं विचारलं,
''बोलतंय कोण ?''
बोलत होता रावस मासा
तो म्हणाला, ''सावध असा.
शेजारीच आहे मेजवानी
हिडू-बिडू नकाच कोणी.''
कोंबडीनं फोन ठेवून दिला.
तिचा जीव घाबरुन गेला.
तेवढ्यात आली बकरीबाई
तिला काहीच ठाऊक नाही
कोंबडी गेली तिच्यापाशी
हळूच लागली कानाशी.
बकरी म्हणाली, ''ऐका तरी
मेजवानी एक आहे खरी
पण पाहुणे आहेत शाकाहारी
मी बातमी काढलीय सारी.

# छोट्यांच्या पाककृती

तुम्हाला सारखी भूक लागलेली असते. ती सुध्दा तुमच्या आवडीच्या पदार्थांची. पण पदार्थांची. पण आई मात्र तुमच्या मनासारखे काही करू देत नाही. खरे आहे ना? मग आपण एक गंमत करू या. तुम्हीच स्वयंपाक घरात शिरून फारशी धडपड न करता काही पदार्थ स्वत:चे स्वत: बनवू शकालात तर? काय म्टलात, जमणार नाही? छे छे अगदी सोपे पदार्थ तुम्हाला बनविता येतील त्यासाठी ते कसे बनवायचे याची साधी सोपी रीत पुढे दिलेली आहे.यात एक गोष्ट मात्र लक्षात ठेवायची गॅस, मिक्सर काही वापरायचे नाही. सुरी, हात न कापता वापरता येत असेल तर ती वापरायची. थोडीशी पूर्वतयारी आई, ताई किंवा स्वयंपाकाच्या काकूंकडून करून घ्यायची. आणि बाकीचे आपण आपले करून घ्यायचे. चला मग. आपण स्वयंपाक घराकडे आपला मोर्चा वळवू या काहीतरी नवीन करण्यासाठी - आणि आवडीचे पदार्थ खाण्यासाठी !'



## टोमॅटो जिंजर सूप


### साहित्य


६ मोठे टॉमेटो १ टिस्पून आले, किसलेले १/४ टिस्पून लाल तिखट १/२ टिस्पून सोया सॉस
१ टेस्पून पाइनॅपल क्रश
चवीपुरते मिठ चवीपुरती साखर १/२ चमचा लिंबू रस

### कृती

टॉमेटो उकडून घ्यावे. उकडलेले टॉमेटो, साधारण दीड कप पाणी, आले, लाल तिखट, अननस, मिठ, साखर आणि लिंबू रस एकत्र मिक्सरमध्ये बारीक वाटावे. गाळण्यातून गाळून घ्यावे. पातेल्यात घालून एक उकळी काढावी. चव पाहून गरजेचे जिन्नस घालावे. सोया सॉस घालून सूप सर्व्ह करावे.

# दिलेल्या चित्रात रंग भरा






दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# आरटीई प्रवेशांवरील १ किमी अंतराची अट 'बेकायदेशीर'

## एमपीजेची मुख्यमंत्र्यांकडे तातडीची मागणी

**परळी | प्रतिनिधी**

शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (RTE) २५ टक्के आरक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेत राज्य सरकारने घातलेल्या १ किलोमीटर अंतराच्या निर्बंधावरून राज्यात नवा वाद पेटला आहे. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी सरकारी निर्णयानंतर १७ फेब्रुवारीपासून प्रवेश प्रक्रिया सुरू झाली; मात्र नवीन मार्गदर्शक तत्त्वांना सामाजिक कार्यकर्ते, पालक गट आणि विविध संघटनांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

Movement for Peace and Justice for Welfare (एमपीजे) या संघटनेने थेट मुख्यमंत्री Devendra Fadnavis यांच्याकडे निवेदन सादर करत १ किमी अंतराची अट तात्काळ रद्द करण्याची मागणी केली आहे. संघटनेचा आरोप आहे की या अटीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि वंचित घटकांतील मुलांसाठी दर्जेदार खाजगी शाळांचे पर्याय मोठ्या प्रमाणात मर्यादित होत आहेत.

■ **पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह-**

नवीन परिपत्रकानुसार, खाजगी विनाअनुदानित शाळांना प्रवेश अर्जांतील कागदपत्रांची पडताळणी करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. यापूर्वी गट शिक्षण अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षक, पालक प्रतिनिधी, सामाजिक संघटना व प्रशासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेली सुमारे २० सदस्यांची स्वतंत्र समिती पडताळणी करत होती. त्या समितीच्या मंजुरीनंतर शाळांना प्रवेश नाकारता येत नव्हता, त्यामुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक मानली जात होती.

मात्र नव्या नियमांत ही समिती व्यवस्था रद्द करण्यात आल्याने पारदर्शकता आणि निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

■ **'कायद्यात अंतराची मर्यादा नाही'-**

एमपीजेच्या निवेदनात स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की, शिक्षण हक्क कायद्याच्या कलम १२(१)(क) नुसार खाजगी विनाअनुदानित शाळांनी किमान २५ टक्के जागा आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकांतील मुलांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र कायद्यात १ किंवा ३ किलोमीटर अशी कोणतीही 'परिसर मर्यादा' नमूद नाही.

संघटनेने असा दावाही केला आहे की Bombay High Court यापूर्वी अंतराधारित तरतुदींवर आक्षेप घेतला असून, Supreme Court of India यांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रशासकीय आदेशाद्वारे कायदेशीर अधिकार मर्यादित करता येत नाहीत.

■ **'हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न'-**

एमपीजेच्या प्रवक्त्याने इशारा दिला की, सध्याचे नियम कायम राहिल्यास हजारो मुलांच्या शिक्षणाच्या मूलभूत अधिकारावर गदा येऊ शकते. हा प्रश्न केवळ प्रवेश प्रक्रियेपुरता मर्यादित नसून, आरटीईच्या मूलभूत उद्देशालाच बाधा आणणारा आहे.

राज्य सरकारने अंतराच्या आधारावर प्रवेश मर्यादित करणारे सर्व आदेश आणि परिपत्रके तात्काळ मागे घ्यावीत, तसेच कोणत्याही पात्र खाजगी शाळेला केवळ अंतराच्या निकषावर आरटीई प्रक्रियेतून वगळले जाणार नाही, अशा स्पष्ट सूचना द्याव्यात, अशी संघटनेची ठाम मागणी आहे.

यावेळी MPJ जिल्हाध्यक्ष सय्यद सबाहत अली, उपाध्यक्ष शेख मिन्हाजुद्दीन, सचिव हाफिज अब्दुल हफीज, परळी तालुका उपाध्यक्ष सय्यद अहमद , शेख नवीद, शेख झाकीर सर, शेख हाजी आदी उपस्थित होते.

दरम्यान, हजारो पालक आणि विद्यार्थी राज्य सरकारच्या पुढील निर्णयाकडे लक्ष ठेवून आहेत. आरटीईच्या माध्यमातून समान शैक्षणिक संधी मिळवण्याचे स्वप्न पाहणाऱ्या वंचित घटकांसाठी हा निर्णय अत्यंत निर्णायक ठरणार आहे.



# एसआयआर संदर्भातील राज्यव्यापी जनजागृती मोहीम

## जमाअत-ए-इस्लामी महाराष्ट्र (JIH) कडून महाराष्ट्रभर हेल्प डेस्क तसेच ऑनलाइन/ऑफलाइन मार्गदर्शन पथकांची सुरुवात

**परळी | प्रतिनिधी**

एसआयआर (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन) प्रक्रिया एप्रिल 2026 पासून महाराष्ट्र राज्यात सुरू होणार आहे. इतर राज्यांतील अनुभवांवरून असे स्पष्ट झाले आहे की या प्रक्रियेदरम्यान मोठ्या संख्येने मतदार यादीतून नावे वगळण्यात आली, ज्यामुळे सामान्य जनतेला गंभीर अडचणींना सामोरे जावे लागले. या पार्श्वभूमीवर जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रने संपूर्ण राज्यात व्यापक जनजागृती मोहीम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. ही मोहीम 1 मार्च ते 1 मे 2026 या कालावधीत राबवली जाणार आहे.

या संदर्भात जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रचे राष्ट्रीय व सामुदायिक व्यवहारांचे सचिव अब्दुल मुजीब शेख यांनी सांगितले की सदस्य, कार्यकर्ते, जिल्हा व शहर स्तरावरील पदाधिकारी तसेच स्थानिक नेतृत्व यांच्यासोबत सविस्तर बैठका घेतल्या जातील. या बैठकींमध्ये एसआयआरची पार्श्वभूमी, त्याचे महत्त्व, जनतेसमोर येऊ शकणाऱ्या संभाव्य समस्या आणि पुढील कृती आराखडा यावर सखोल चर्चा केली जाईल. त्यांनी पुढे सांगितले की महाराष्ट्राला सहा विभागांमध्ये विभाजित करण्यात येईल आणि प्रादेशिक



समन्वयकांच्या देखरेखीखाली जिल्हा व स्थानिक स्तरावर जनजागृती बैठका आयोजित केल्या जातील. जनतेला माहिती देण्यासाठी एक एसआयआर हेल्पलाईन सुरू केली जाईल तसेच कागदपत्रांबाबत मार्गदर्शन व प्रत्यक्ष मदत देण्यासाठी हेल्प डेस्क कार्यान्वित करण्यात येईल. स्थानिक स्तरावर ऑफलाइन हेल्प डेस्कद्वारे कागदपत्रे तयार करण्यास मदत व आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन दिले जाईल. या मोहिमेत प्रशिक्षण कार्यक्रमाचाही समावेश असून त्याअंतर्गत स्थानिक कार्यकर्ते तयार केले जातील, जे आपल्या-आपल्या भागात एसआयआर संदर्भातील जनजागृतीचे काम करतील. विशेषतः आयटी क्षेत्राशी संबंधित व्यक्तींचे सहकार्य घेतले जाईल.

जमाअत-ए-इस्लामी हिंद महाराष्ट्रचे अध्यक्ष मौलाना इलियास खान फलाही यांनी आपल्या भाषणात सांगितले की धार्मिक, राजकीय आणि सामाजिक माध्यमांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबवली जाईल. यामध्ये मशिदींचे इमाम, इस्लामी विद्वान तसेच राजकीय, सामाजिक, सामुदायिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील व्यक्तींशी बैठका घेतल्या जातील; जुम्मा व ईदच्या ख़ुत्ब्यांमधून, मशिदींमधील घोषणा तसेच विद्वान व सामुदायिक नेत्यांच्या व्हिडिओ संदेशांद्वारेही जनतेपर्यंत संदेश पोहोचवला जाईल. याशिवाय मीडिया आणि सर्जनशील माध्यमांचा वापर करून - जसे की लघु व्हिडिओ क्लिप्स, लघुपट आणि स्ट्रीट प्ले (नुक्कड नाटक) - जनतेपर्यंत माहिती पोहोचवली जाईल. ही मोहीम अधिकाधिक उपयुक्त ठरावी यासाठी वकील, कायदेविषयक तज्ज्ञ, सरकारी संस्था व अधिकारी यांच्याशी संपर्क साधला जाईल आणि गरज भासल्यास भारत निवडणूक आयोगाशीही भेट घेऊन जनतेला भेडसावणाऱ्या अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या जातील. या उद्देशासाठी संपूर्ण राज्यात लवकरच पथके स्थापन करून त्यांना जबाबदाऱ्या सोपवण्यात येतील, असेही JIH अध्यक्षांनी स्पष्ट केले.

# आमदार एकनाथराव खडसे यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; 'पोकरा' टप्पा-२ च्या अंमलबजावणीला मिळणार गती!

**मुक्ताईनगर प्रतिनिधी: सागर नानोटे**

राज्यातील शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी मानल्या जाणाऱ्या 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या' (पोकरा) दुसऱ्या टप्प्याला अखेर गती मिळणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) ज्येष्ठ नेते व आमदार एकनाथराव खडसे यांनी ९ डिसेंबर २०२५ रोजी विधान परिषद सभागृहात विशेष उल्लेख सूचना क्रमांक २३ द्वारे सरकारचे लक्ष वेधले होते. सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे राज्य सरकारने या प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी सकारात्मक पावले उचलली असून, यामुळे जळगाव जिल्ह्यासह राज्यातील हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.


शेतकऱ्यांच्या हितासाठी खडसेंचा आक्रमक पवित्रा

पोकरा प्रकल्पाचा पहिला टप्पा यशस्वी झाल्यानंतर, दुसऱ्या टप्प्याची घोषणा होऊनही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी रखडलेली होती. यामुळे अनेक गावे आणि शेतकरी लाभापासून वंचित होते. आमदार एकनाथराव खडसे यांनी विधीमंडळ अधिवेशनात आणि कृषी विभागाच्या वरिष्ठ स्तरावर या विषयावर सातत्याने आवाज उठवला. "हवामान बदलाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना पोकरा-२ च्या माध्यमातून मदतीचा हात मिळणे गरजेचे आहे," अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली होती.

■ **काय आहे 'पोकरा' टप्पा-२?**

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबविल्या जाणाऱ्या या प्रकल्पात प्रामुख्याने खालील बाबींवर लक्ष केंद्रित केले जाणार आहे:

- **हवामान अनुकूल शेती: बदलत्या हवामानानुसार शेती पद्धतीत बदल करण्यासाठी प्रोत्साहन.**
- **सिंचन सुविधा: वैयक्तिक शेततळी, विहिरी आणि ठिबक सिंचनासाठी भरघोस अनुदान.**
- **शेतकरी गट सक्षमीकरण: शेतकरी उत्पादक कंपन्यांना (FPO) प्रक्रिया उद्योगांसाठी मदत.**
- **मृद व जलसंधारण: जमिनीचा पोत सुधारण्यासाठी विविध**



**उपक्रम.**

■ **जळगाव जिल्ह्याला मोठा फायदा**

मुक्ताईनगर, रावेर यासह जिल्ह्यातील इतर तालुक्यांमधील अनेक गावांचा समावेश या दुसऱ्या टप्प्यात करण्यात आला आहे. खडसेंच्या पाठपुराव्यामुळे या गावांच्या सूक्ष्म नियोजनाला (Micro-planning) आता वेग येणार असून, प्रलंबित अर्ज निकाली काढण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

"शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा त्यांना वेळेत मिळावा, हीच आमची भूमिका होती. पोकरा-२ मुळे पुन्हा एकदा ग्रामीण भागात कृषी क्रांतीला सुरुवात होईल. प्रशासनाने आता कोणतीही दिरंगाई न करता थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहचावे."

**— आमदार एकनाथराव खडसे**

या निर्णयामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण असून, आमदार खडसेंनी मिळवलेल्या या यशाबद्दल त्यांचे ठिकठिकाणी स्वागत होत आहे.

# उर्जा संवर्धन संशोधन प्रकल्पाची राज्यस्तरावर निवड!

## कु.आराध्या जायभाये करणार प्रकल्पाचे सादरीकरण

**नांदेड:** येथील शाकुंतल विद्यालयातील इयत्ता सहावी (सीबीएसई) वर्गात शिकत असलेली कु.आराध्या सुधाकर जायभाये हिने नांदेड येथे संपन्न झालेल्या विभागीय डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धेचे दोन टप्पे यशस्वीरीत्या पार केले असून तिची मुंबई येथे राज्यस्तरीय स्पर्धेत प्रकल्प सादरीकरणासाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत कु.आराध्या ही "उर्जा लेखापरीक्षण आणि संवर्धन" (एनर्जी ऑडिट अँड कन्झर्वेशन) विषयावर आपला संशोधन प्रकल्प सादर करणार आहे. शाश्वत उर्जा संवर्धन ही काळाची गरज असून उर्जा बचत म्हणजे खऱ्या अर्थाने देशाच्या शक्तीची बचत आहे. या अनुषंगाने तिने नांदेड येथील उर्जा संदर्भात विविध शासकीय आणि खाजगी कार्यालयांना भेटी देऊन उर्जेचे महत्व जाणून घेतले असून आपल्या प्रकल्पात ती उर्जा बचत आणि उर्जा वापर बाबतीत विविध आधुनिक उपकरणांचा वापर जसे एलीडी वापर, सोलर उर्जा, पवनचक्की, जलउर्जा इत्यादी उर्जेच्या संदर्भाने आपले संशोधन सादर करणार आहे. तसेच उर्जा बचतीच्या अनुषंगाने विविध पोस्टर्स,



गावात आणि शहरात जाऊन उर्जा संवर्धन संदर्भात जागृती करण्याचे ती सांगणार आहे. या प्रकल्पासाठी तिने स्वतः विविध पोस्टर्स तयार केले असून या यशाबद्दल कु.आराध्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. या प्रकल्पासाठी तिला शाकुंतल विद्यालयाचे प्राचार्य श्री सदाशीव टाकळे, उपप्राचार्या भावना बार्शीकर, नांदेड एमएसईबीच्या अभियंता किरण देशमुख, एमजीएम, नांदेडचे प्रा.डॉ.गंगाधर बरसे, श्री पांडुरंग इलेक्ट्रिकल यांनी मार्गदर्शन केले असून सर्वांनी पुढील स्पर्धेसाठी तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

# पंचनामे करून मदत देण्यात यावी–किसान सभा

## अवकाळी पावसाने रब्बी पिकांचे मोठे नुकसान

**परळी / प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील मोहा, सिरसाळा, गाढे पिंपळगावसह सर्वच महसूल मंडळात सोमवार दि 23 रोजी सोसाट्याचा वाऱ्यासहअवकाळी पाऊसने रब्बी पिकांचे मोठे नुकसान झाले असून पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून मदत देण्यात यावी अशी मागणी किसान सभेने परळी महसूल कार्यालयात निवेदनाद्वारे केली.

परळी तालुक्यातील सर्वच महसुली मंडळात सोमवार दि २३ रोजी वादळी वाऱ्यासह मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, काढणीला आलेली उभी पिके भूईसपाट झाली आहेत. यामध्ये प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, हरभरा आणि गहू या पिकांचा समावेश आहे. हाता तोंडाशी आलेला घास या पावसामुळे हिरावला गेल्याने शेतकरी पूर्णपणे हतबल झाल्याने किसान सभेने प्रशासनाला निवेदन करत महसूल व कृषी विभागाने तातडीने परळी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पिकाच्या नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत, खरीप 2025 चा पीक विमा तातडीने द्यावा. खरीप 2026 मधील अतिवृष्टी व अवकाळी पावसाचे अनुदान लवकरात लवकर वितरित करावी या मागण्या केल्या आहेत. या प्रसंगी किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे, रमण सोळंके, माणिक सोळंके, नागनाथ सातभाई, प्रकाश चव्हाण आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.



# आर्थिक बेशिस्तीला मुख्यमंत्री फडणवीसांचा लगाम



**मुंबई :** प्रत्येक अधिवेशनात हजारो कोटी रुपयांच्या विक्रमी पुरवणी मागण्या सादर करण्याच्या आर्थिक बेशिस्तीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अखेर लगाम घातला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी मंगळवारी दोन्ही सभागृहात ११ हजार ९९५ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. त्यामुळे सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात पुरवणी मागणीच्या माध्यमातून अर्थसंकल्पीय बाह्य खर्चाचा आकडा १ लाख ४५ हजार कोटीवर पोहचला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत, तर अर्थ राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी विधान परिषदेत सन २०२५-२६ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. या मागण्यांपैकी १ हजार ६७ कोटी मागण्या अनिवार्य खर्चाच्या तर ९ हजार ३२२ कोटीच्या मागण्या कार्यक्रमांतर्गत खर्चाच्या आहेत. या पुरवणी मागण्यांमुळे सरकारवर ४ हजार ६९९ कोटी रुपयांचा निव्वळ भार येणार आहे. या मागण्यांवर २६ आणि २७ फेब्रुवारी रोजी चर्चा होणार आहे. सौर कृषीपंप योजनेसाठी एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाची रक्कम महावितरण कंपनीला हस्तांतरित करण्यासाठी ४ हजार ७९२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यातील कृषिपंप, यंत्रमाग आणि वस्त्रोद्योग ग्राहकांना विद्युत प्रशुल्कात सवलत देण्यासाठी ३ हजार ११२ कोटी, जलजीवन मिशन योजनेच्या अंतर्गत केंद्र हिश्श्यासाठी १ हजार ४३१ कोटी रुपये पुरवणी मागणीत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सामूहिक प्रोत्साहन योजनेच्या अंतर्गत लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योग घटक तसेच विशाल प्रकल्पाना प्रोत्साहन रक्कम म्हणून ८०३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. जलसंपदा विभागाच्या अंतर्गत विविध महामंडळे, पंतप्रधान कृषी सिंचन योजना, राज्यातील आरोग्य संस्था आणि रुग्णलयांच्या बांधकामे, हायब्रीड ॲन्युटीच्या माध्यमातून बांधण्यात येणारे रस्ते, पूल, शिवभोजन योजना , क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना यांच्यासाठी पुरवणी मागणीत एक हजार रुपयांची लाक्षणिक तरतूद करण्यात आली आहे.

## वार्ता समुहाच्या 18 व्या वर्धापन दिनी एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर व नामांकित उद्योजक रावसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थिती

# 7 मार्च रोजी 18 व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने भूमिपुत्रांचा होणार अंबाजोगाईत सन्मान



श्री.राजीवजी खांडेकर – प्रमुख आकर्षण | श्री.रावसाहेबजी घुगे – प्रमुख आकर्षण | श्री.अशोकराव नखाते – नगरभूषण पुरस्कार | श्री.गौतमचंद सोळंकी – सद्भावना पुरस्कार | श्री.सुशील गाडवे – युवा गौरव पुरस्कार | श्री.दिपकजी वजाळे – सेवा गौरव सन्मान | श्री.गणेशराव पवार – सेवा गौरव सन्मान

## नगर भूषण - अशोकराव नखाते, सदभावना - गौतमचंद सोळंकी, युवा गौरव पुरस्कार - सुशिल गाडवे यांना जाहिर, उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे व गणेश पवार होणार सेवागौरव सन्मानाने सन्मानीत

**अंबाजोगाई / प्रतिनिधी**

गेल्या 18 वर्षापासुन बीड जिल्ह्यात सकारात्मक पत्रकारितेच्या माध्यमातून नावारूपास आलेले आणि समाजातील वास्तव परिस्थितीची मांडणी करून लोकाभिमुख ठरलेल्या दैनिक वार्ता समुहाचा 18 वा वर्धापन दिन सोहळा येत्या शनिवार, दि.7 मार्च 2026 रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत साजरा करण्यात येत आहे. वर्धापन दिनाच्या निमित्ताने जगभरात नावलौकिक प्राप्त असलेल्या एबीपी माझा मराठीचे व एबीपी हिंदी न्युजचे मुख्य संपादक राजीव खांडेकर व भारतातील प्रसिद्ध उद्योजक रावसाहेब घुगे यांची प्रमुख उपस्थित असणार आहे. तर वर्धापन दिनाच्या निमित्ताने दिल्या जाणार्या पुरस्कारांची घोषणा करण्यात आली. ज्यामध्ये नगर भूषण पुरस्कार हा जळगाव येथील अप्पर पोलिस अधिक्षक अशोकराव नखाते, सदभावना पुरस्कार प्रगतशील शेतकरी व उद्योजक गौतमचंद सोळंकी यांना तर युवा गौरव पुरस्कार हा पुणे येथील युवा उद्योजक सुशिल शंकरराव गाडवे यांना जाहिर करण्यात आला. त्यासोबतच अंबाजोगाई येथील उपजिल्हाधिकारी दिपक वजाळे व मुंबई येथील उपजिल्हाधिकारी गणेशराव पवार यांना त्यांच्या उत्कृष्ट महसुली सेवेबद्दल सन्मानित केले जाणार आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहर आणि परिसरामध्ये ज्यांनी नावलौकिक असे कार्य केले आहे. त्यांचा ही सन्मान सत्कार मान्यवरांच्या उपस्थितीत केला जाणार असल्याची माहिती वार्ता समुहाचे संपादक परमेश्वर गित्ते यांनी दिली आहे.

बीड जिल्ह्याच्या पत्रकारितेमध्ये गेल्या 18 वर्षापासुन अखंडीत पणे व सातत्याने दैनिक वार्ता या वृत्तपत्राच्या वतीने समाजातील वेगवेगळ्या क्षेत्रातील पैलुंवर प्रकाशझोत टाकण्यात येतो. त्या सोबतच सामाजिक स्तरावर काम करत असताना जे विविध घटक आहेत. त्यांना पटलावर आणून व्यवस्थेमार्फत न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. पत्रकारिता करीत असताना सामाजिक भान राखूनच प्रश्न मांडलेले आहेत. सामाजिक जाणिवा व संवेदना जपत वार्ता समुहाने सामाजिक दायित्व अदा केलेले आहे. त्यानुषंगाने 18 वर्षे पुर्ण करून 19 व्या वर्षात पर्दापण केले आहे. 18 व्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने यंदाही वर्धापन दिन सोहळा, जाहिर सत्कार, व पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. 7 मार्च 2026 रोजी अंबाजोगाई येथील मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह नगर परिषद येथे सायंकाळी 5.30 वाजता आयोजित केला आहे. या वर्धापन दिन सोहळ्यासाठी जगभरात नावलौकिक प्राप्त मराठी वृत्तवाहिनी असलेल्या एबीपी माझा व एबीपी हिंदी न्युज चे मुख्य संपादक राजीव खांडेकर तसेच भारतातील प्रसिद्ध उद्योजक आणि बाप आयटी कंपनीचे संस्थापक रावसाहेब घुगे हे प्रमुख आकर्षण असणार आहे. आणि त्यांचे विचार हे अंबाजोगाईकरांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अंबाजोगाई पिपल्स बँकेचे चेअरमन राजकिशोर मोदी हे असणार आहेत. तर प्रमुख अतिथी म्हणून अंबाजोगाईचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, बृहन्मुंबई महानगर पालिकेचे उपमुख्यअभियंता इंजि.नवनाथ घाडगे पाटील, परभणी येथील कार्यकारी अभियंता इंजि. प्रसाद लांब, परळी वै.च्या नगराध्यक्षा पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, धारूरचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, केजच्या नगराध्यक्षा सितातीई बनसोड, जिवन शिक्षण समुह केजचे संस्थापक अध्यक्ष हारूणभाई इनामदार, अभियांत्रिकी महाविद्यालय अंबाजोगाईचे प्राचार्य डॉ.बी. आय.खडकभावी, केज येथील गंगामाऊली शुगरचे व्हा.चेअरमन हनुमंत मोरे, अ.भा.फिजीशिएशन असो.अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे, आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष राहुल धाकडे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तर वार्ता समुहाच्या वतीने दरवर्षी दिले जाणारे विविध पुरस्कारांचे वितरण मान्यवरांच्या हस्ते केले जाणार आहे. ज्यामध्ये 2026 चा नगरभूषण पुरस्कार हा जळगाव येथे अप्पर पोलिस अधिक्षक असलेले अशोकराव नखाते यांना जाहिर करण्यात येत आहे. अशोकराव नखाते यांचे शालेय शिक्षण अंबाजोगाईच्या भूमीतच झाले आहे. विविध शासकीय पदांवर काम त्यांनी केले आहे. ज्यामध्ये ग्रामसेवक, सहाय्यक निबंधक आणि पोलिस उपअधिक्षक व आता अप्पर पोलिस अधिक्षक या पदापर्यंत त्यांची वाटचाल राहिलेली आहे. सदभावना पुरस्कार 2026 हा अंबाजोगाई येथील प्रगतशिल शेतकरी व उद्योजक गौतमचंद सोळंकी यांना जाहिर करण्यात आला आहे. सोळंकी हे गेल्या 50 वर्षापेक्षा अधिक काळापासून अंबाजोगाई शहरामध्ये नवजीवन मशिनरी स्टोअर्सच्या माध्यमातून ग्राहक सेवेत आहेत. त्यासोबतच प्रगतशील शेतकरी म्हणून त्यांचा आवर्जुन उल्लेख केला जातो. नाविन्यपुर्ण प्रयोग हा त्यांचा छंद आहे. सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून चांगली सेवा देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. सामाजिक कार्यात सुद्धा त्यांचे योगदान आहे. बँकिंग क्षेत्रातही त्यांची वाटचाल राहिलेली आहे. युवा गौरव पुरस्कार सुशिल शंकरराव गाडवे यांना जाहिर करण्यात आला आहे. सुशिल गाडवे हे अंबाजोगाईचे भूमिपुत्र असून त्यांनी पुणे शहरामध्ये शुन्यातून विश्व निर्माण केले आहे. हजारो लोकांना त्यांच्या स्वप्नातील घरे उपलब्ध करून दिली आहेत. रिअल स्टेट व बांधकाम क्षेत्रातील यशस्वी उद्योजक म्हणून त्यांचा लौकिक आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहरामध्ये गेल्या 2 वर्षापासुन उपजिल्हाधिकारी म्हणून कार्यरत असलेले दिपक वजाळे यांनी सामाजिक भान राखत आपली महसुली सेवा दिलेली आहे. तसेच मुंबईचे उपजिल्हाधिकारी असलेले गणेश पवार यांनीही महसुल खात्यात वेगवेगळ्या पदांवर काम करून उपजिल्हाधिकारी पदापर्यंत वाटचाल केलेली आहे. दोन्ही उपजिल्हाधिकारी महोदयांच्या सेवेचा सन्मान व गौरव म्हणून त्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे. त्यासोबतच अंबाजोगाई शहर व तालुक्यात विविध क्षेत्रामध्ये ज्यांनी यश संपादन केले आहे. अशांचाही सत्कार या ठिकाणी केला जाणार आहे. ज्यामध्ये अंबाजोगाई येथील स्वाराती रूग्णालयाचे नेत्ररोग विभाग प्रमुख डॉ.ज्ञानोबा दराडे, नेत्ररोग तज्ञ डॉ.एकनाथ शेळके, स्वाराती रूग्णालयातील सर्जन डॉ.नितीन चाटे, मधुमेहतज्ञ डॉ.अतुल शिंदे, मिसेस महाराष्ट्र स्पर्धेच्या उपविजेत्या डॉ.सुनिता गणेश तोंडगे, पोलिस निरिक्षक शरद जोगदंड, इंजि. वरद सत्येंद्र बर्दापुरकर, ज्ञानदिप ॲकॅडमीचे संचालक प्रा.दत्ता दराडे यांचा समावेश आहे.

तर कार्यक्रमाच्या प्रारंभी सांस्कृतिक कार्यक्रमात महागायक सुभाष शेप,आसाराम जोशी, प्रदिप चोपने, शाहीर गणेश मामा काळे व इतरांचा सहभाग असणार आहे. तरी कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिक-बंधु -भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन वार्ता समुहाचे संपादक परमेश्वर गित्ते, अंबाजोगाई तालुका पत्रकार संघ, तालुका पत्रकार संघ अंबाजोगाई, अ.भा.मराठी पत्रकार परिषद, अंबाजोगाई, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अंबाजोगाई, अ.भा.मराठी डिजीटल पत्रकार संघ, अंबाजोगाई, गुडमॉर्निंग ग्रुप, अंबाजोगाई , व्हाईस ऑफ मिडीया शाखा अंबाजोगाई यांनी केले आहे.






# परळी वैजनाथ येथे ब्रह्माकुमारीजच्या वतीने 'स्नेह मिलन' सोहळा ; नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई धर्माधिकारी यांची प्रमुख उपस्थिती



## आध्यात्मिक मूल्ये आणि सकारात्मक जीवनशैली अत्यंत महत्त्वाची –सौ.पद्मश्रीताई धर्माधिकार

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):**

येथील प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने 'स्नेह मिलन' या विशेष आध्यात्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी अध्यक्ष म्हणून उपस्थिती दर्शविली. या प्रसंगी बोलताना नगराध्यक्षांनी राजयोग ध्यान, आध्यात्मिक मूल्ये आणि सकारात्मक जीवनशैली यांचे महत्त्व अधोरेखित केले. समाजात शांतता, नैतिकता आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्यासाठी अशा प्रकारच्या प्रेरणादायी कार्यक्रमांची आज नितांत गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून माऊंट आबू येथील व्यापार आणि उद्योग प्रभाग मुख्यालय-संयोजिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी गीता दीदी जी उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना तणाव व्यवस्थापन आणि व्यक्तिमत्व विकासावर अनमोल मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि स्नेहपूर्ण वातावरणामुळे उपस्थितांना एक नवी आत्मिक ऊर्जा व प्रेरणा लाभली. या कार्यक्रमाला हिंडौन सिटीच्या संचालिका राजयोगिनी ब्र.कु. हेतल दीदी, माऊंट आबू येथील मोटिवेशनल स्पीकर राजयोगी ब्र.कु. राजसिंह भाई, डॉ. अरुण गुट्टे आणि अल्ट्राटेक सिमेंटचे वरिष्ठ

सरव्यवस्थापक प्रकाश सिंह हे मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन पंचवटी नगर येथील ब्रह्माकुमारीज केंद्रात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय यांच्यावतीने परिश्रम घेतले कार्यक्रमास ब्रह्मकुमारी , नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.